# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक 18/06/2019

## सभा सुचना क्रं. 02

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | **मागील मा. स्थायी समिती सभा दि. 03/06/2019 रोजीचे इतिवृत्त कायम करणे.** | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. 03/06/2019 रोजीचे इतिवृत्त कायम करणेस सभेने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. अफिफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | **स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्व्हेक्षण 2020 व City Liveability 2019 मुल्यांकनाच्या कामी नेमलेल्या शहर समन्वयक (कंत्राटीतत्वावर) यांना मुदतवाढ देण्यास तसेच या कामी येणाऱ्या खर्चास सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवुन असे ठरविण्यांत आले की, स्वच्छ सर्व्हेक्षण 2019-20 व City Liveability Assessment कामी नियुक्त केलेल्या कु.दिपाली वामन पाटलेकर व सौ.श्वेता एस. माने शहर समन्वयक यांना पुढील सहा महिने म्हणजेच दि.31 ऑगस्ट 2019 पर्यंत मुदतवाढ देण्यास व शासनस्तरावर नियुक्त केलेल्या शहर समन्वयकांसाठी निश्चित केलेल्या रु.55000/- प्रति महिना याप्रमाणे वेतन अदा करण्यास व त्यानुसार येणाऱ्या दोन शहर समन्वयाकांच्या मानधना पोटी पुढील सहा महिन्यांच्या रु. 6,60,000/- खर्चास तसेच या कामी येणाऱ्या एकूण रु.10,80,000/- खर्चास सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल सांळुखे सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 3. | **वसई ते रामेश्वर (तामिळनाडू) सायकल मोहिमेसाठी वित्त सहाय्य मंजुर करणेबाबत.** | **ठराव :-** वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली त्यानुसार प्रस्तावात सादर केल्याप्रमाणे मा.सर्वसाधारण ठराव क्र. 05 दिनांक 14/07/2017 अन्वये साहसी खेळास प्रोत्साहनपर रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची मंजूर नियमावलीच्या अनुषंगाने दर्शन दत्तात्रेय वर्तक, ज्युड डिसोजा, सचिन कवळी, भुपेश राऊत व पराग घरत यांना प्रत्येकी रुपये 25,000/- इतके वित्तसहाय्य देणेकामी ही सभा सर्वानुमत्ते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 4. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती सी चंदनसार येथील घाऊक बाजार लिलावाबाबत.** | **ठराव :-** सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन प्रभाग समिती सी चंदनसार प्रभागात भरणारा घाऊक बाजार ठेका सन 2019-20 या वित्तीय वर्षाकरीता सन 2016-17 वर्षातील प्रत्यक्ष वसुली रक्कम 32,65,084/- अपेक्षित रक्कमेवर 10% वाढ करुन 35,91,592/- इतकी रक्कम गृहित धरुन सन 2019-20 या वित्तीय वर्षाकरीता सदरचा घाऊक बाजार वसुली लिलाव ई-निविदेद्वारे काढण्याबाबत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन ई निविदा मागविणेकामी त्या अनुषंगाने येणाऱ्या प्रशासकीय व अनुषंगीक खर्चास ही सभा वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर ना. पाटील सूचक :- मा.श्री. अतुल साळुंखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 5. | **राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंना बक्षिस पर वित्त सहाय्य अदा करणेबाबत.** | **ठराव :-** वरील प्रस्तावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली त्यानुसार मा.सर्वसाधारण ठराव क्र.05 दिनांक 14/07/2017 च्या सर्वसाधारण नियमावलीतील अटी व शर्ती नुसार वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकलेल्या स्पर्धकाला |

| | | |
|---|---|---|
| | | प्रोत्साह पर अनुदान असे प्रस्तावातील वित्त सहाय्य मागणी अर्ज क्र.01 ते अर्ज क्र.77 अशा एकूण 77 खेळाडूंना रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची मंजूर नियमावलीच्या अनुषंगाने वित्तसहाय्य देणेकामी ही सभा मंजुरी देत आहे. व त्याकामी होणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमत्ते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 6. | **<u>श्री. गुरुनाथ कृष्णा कापडी, लिपीक यांचे वैद्यकीय बिलाची प्रतीपुर्ती करुन मिळणेबाबत.</u>** | **ठराव :-** जिल्हा शल्य चिकीत्सक, पालघर यांचेकडील दिनांक 06/03/2019 रोजीचे आदेश पाहण्यांत आले. श्री. गुरुनाथ कृष्णा कापडी यांस सदरहू आदेशाप्रमाणे त्यांचेवर शस्त्रक्रिया व औषधोपचारा करीता झालेल्या खर्चापैकी रक्कम रु. 7,39,279/- (अक्षरी सात लाख एकोणचाळीस हजार दोनशे एकोणऐंशी मात्र) अदा करणेस आजची हि सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 7. | **<u>वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व माता बाल संगोप केंद्रास सन 2019-20 या वित्तीय वर्षात ऑक्सिजन सिलेंडर रिफीलींगसह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणेकामीच्या ई-निविदेस मा.स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने सदरचा विषय</u>** | **ठराव :-** ऑक्सिजन सिलेंडर रिफीलींग सह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदेस मा.स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, निविदाकारक मे.लिओ ऑक्सिजन यांचे वरील सोबतच्या सुचीतील नमुद घटकांचे दर बाजारभावाशी तुलना केली असता योग्य व वाजवी आहेत. सदरची ई-निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखाअधिक्षक यांनी तपासली असून दि.30/05/2019 रोजीच्या निविदा समितीने अंतिम मान्यतेस्तव शिफारस केलेली आहे. तरी वरील नमुद घटक निहाय बाबींकरीता प्राप्त झालेल्या कमी दराच्या ई-निविदाकाराबरोबर महाराष्ट्र महापालिका अधिनियम 73(क) |

| | | |
|---|---|---|
| | **मंजूरीस्तव सादर.** | अन्वये संविदा करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे. तसेच सन 2019-20 या वर्षाकरीता ऑक्सिजन सिलेंडर रिफीलींग सह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 8. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व माता बाल संगोपन केंद्रास सन 2019-20 या वित्तिय वर्षात उपकरणे, सर्जिकल साहित्य व तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तु खरेदी करणेकामीच्या ई-निविदेस मा.स्थायी समितीच्या मंजूरीची आवश्यकता असल्याने सदरचा विषय मंजुरीस्तव सादर.** | **ठराव :-** उपकरणे, सर्जिकल साहित्य व तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तु खरेदी करणेकामीच्या मागविण्यात आलेल्या ई-निविदेस मा.स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, वरील सोबतच्या सुचीतील नमुद घटकांचे दर बाजारभावाशी तुलना केली असता योग्य व वाजवी आहेत. सदरची ई-निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखाअधिक्षक यांनी तपासून मंजुरीस शिफारस केली आहे. तसेच दि.30/05/2019 रोजीच्या निविदा समितीने अंतिम मान्यतेस्तव शिफारस केलेली आहे. तरी वरील सर्व नमुद घटकांच्या कमी दराच्या ई-निविदाकारांबरोबर महाराष्ट्र महापालिका अधिनियम 73(क) अन्वये संविदा करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे. तसेच सन 2019-20 या वर्षाकरीता उपकरणे, सर्जिकल साहित्य व तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तु खरेदी करणेकामीच्या येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री.अफीफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 9. | **वसई विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत अंगणवाडीतील विद्यार्थ्यांसाठी सन** | **ठराव ;-** सदरच्या अंगणवाडील प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. 1) मे. जे.एम.डी. एंटरप्रायजेस अ.क्र. 1 दप्तर 900 ०x 900 कोड मॅटी मटेरिअल प्रती नग दर अनुक्रमे 165.40% रू. 2) हरजित कलेक्शन अ.क्र. 2) प्लास्टिक वॉटर बॅग (500 एम.एल) |

| | | |
|---|---|---|
| | **2019-20 या वित्तीय वर्षात शालेय साहित्य वाटप करणेकामी कमी दराच्या निविदाधारकाच्या दरास मंजूरी देऊन कमी व योग्य दराच्या निविदाधारकासोबत संविदा करण्यास मान्यता देण्याबाबत.** | नमुन्याप्रमाणे प्रती नग दर अनुक्रमे रू. 28.70 रू., अ.क्र. 3) प्लास्टिक टिफीन बॉक्स यलो ( डबल डेकर) प्रती नग दर अनुक्रमे रू. 35.90 रू, सदर दराच्या बाजारभावाप्रमाणे पडताळणी केली असता, सदर बाजारभाव य़ोग्य व वाजवी असल्याने मा.निविदा कमिटीने दिनांक 30/05/2019 रोजी कमी दराच्या निविदेस मंजूरी दिली आहे. त्यानुसार कमी दराच्या निविदा मंजूर करणेंत येत आहेत. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 73 (क) अन्वये सर्वात कमी दराच्या निविदाधारकाबरोबर संविदा करणेंस व अंगणवाडीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार शैक्षणिक साहित्या खरेदी करण्यास येणाऱ्या अंदाजे 19500 विद्यार्थ्यांकरीता रू. 45,00,000/- (अक्षरी पंचेचाळीस लक्ष) खर्चास ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना.पाटील सूचक :- मा.श्री. अफीफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 10. | **सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 हया त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील गटारावर, फुटपाथवर व मुख्य रस्त्यावर विविध व्यासाची प्रिकास्ट आर.सी.सी. झाकणे पुरविणे व बसविणे.** | **ठराव ;-** सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव/विषय क्र. 13 दि.19/152/2018 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्टया पाहता मे.अनायडा एंटरप्रायजेस , मे.संजय कंन्स्ट्रक्शन , मे. श्री साईदत्त कंन्स्ट्रक्शन व मे. नितेश मोहन मलवानी यांनी सन 2019-20 करिताचे भरलेले दर (वाटाघाटी अंती) वरील प्रमाणे कमी करुन दिले आहेत. सदरचे दर सन 2018-19 करिताच्या (SSR) नुसार तुलना केली असता योग्य व कमी असल्याचे दिसुन येत आहे. सदर कामी निविदेनुसार मागविणेत आलेले दर 3 वर्षाकरीता असल्याने मे.अनायडा एंटरप्रायजेस , मे.संजय कंन्स्ट्रक्शन , मे. श्री साईदत्त कंन्स्ट्रक्शन व मे. नितेश मोहन मलवानी यांच्या मार्फत भरणेत आलेल्या दरांपैकी केवळ सन 2019-20 करीता भरलेल्या दरांची चालु |

| | | |
|---|---|---|
| | | दरसुची (SSR सन 2018-19) नुसार तुलना करणेत आली असून सदरचे दर (वाटाघाटी अंती) योग्य व वाजवी आहेत.सार्व.बांधकाम विभागाकडून नविन (SSR/दरसुची) निर्गमीत झाल्यानंतर मे.अनायडा एंटरप्रायजेस ,मे.ओमकार एंटरप्रायजेस, मे. श्री साईदत्त कंन्स्ट्रक्शन व मे. नितेश मोहन मलवानी यांनी सन 2020-21 व सन 2021-22 करीता भरलेल्या दरांची नवीन SSR/दरसुची नुसार तुलना करुन सन 2020-21 व सन 2021-22 या वर्षाकरीताचे दर वाटाघाटीने निश्चित करुन मा.निविदा समिती सभेची तसेच मा. स्थायी समितीची दर मंजूरी घेऊन आर.सी.सी. चेंबर कव्हर पुरविणेचे व बसविणेचे आदेश देणे उचीत व योग्य ठरेल तसेच नविन SSR/दरसुची प्रसिध्द होईपर्यंत चालु वर्षाच्या दरसुची नुसार दर लागु राहतील.तरी मे.अनायडा एंटरप्रायजेस , मे.संजय कंन्स्ट्रक्शन , मे. श्री साईदत्त कंन्स्ट्रक्शन व मे. नितेश मोहन मलवानी यांचे सन 2019-20 करीताचे प्राप्त दर (वाटाघाटी अंती) योग्य व कमी असुन मंजूर करणेकरीता शिफारस करण्यात येत आहे. सदर कमी दराची निविदा मंजूरीस्तव सादर.तसेच सदर दराने निविदेमधील सहभाग घेतलेले अन्य निविदाधारक काम करण्यास इच्छुक असल्यास त्यांची पॅनलवर नियुक्ती करुन घेणेकरीता दि. 11/02/2019 पत्र देण्यात आले होते तरी सदर पत्रास अनुसरुन मे.अनायडा एंटरप्रायजेस हयांनी आपल्या दि. 13/02/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे निविदेमधील फुटपाथवरील प्रिकास्ट आर. सी. सी झाकणे अनु. क्र. 1, 2, 3 मधील बाब क्र. a,b,c तसेच प्रिकास्ट आर.सी.सी झाकणे बसविणेकरीता अनु.क्र. a,b व c करीता मे.संजय कंन्स्ट्रक्शन हयांनी आपल्या दि. 20/02/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे निविदेमधील फुटपाथवरील प्रिकास्ट आर.सी.सी झाकणे अनु.क्र.1,2,3 मधील बाब क्र. a,b,c तसेच प्रिकास्ट आर.सी.सी झाकणे |

| | | |
|---|---|---|
| | | बसविणेकरीता अनु.क्र. a व c करीता, मे.श्री गणेश एंटरप्रायजेस हयांनी आपल्या दि 20/02/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे निविदेमधील फुटपाथावरील प्रिकास्ट आर.सी.सी झाकणे अनु. क्र.1,2,3 मधील बाब क्र. a,b,c तसेच प्रिकास्ट आर.सी.सी. झाकणे बसविणेकरीता अनु.क्र a व c करीता मे.ओमकार एंटरप्रायजेस हयांनी आपल्या दि.20/02/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे निविदेमधील फुटपाथवरील प्रिकास्ट आर.सी.सी.झाकणे अनु. क्र.1,2,3 मधील बाब क्र. a,b,c तसेच प्रिकास्ट आर.सी.सी. झाकणे बसविणेकरीता अनु.क्र a व c करीता मे.साईदत्त कंन्स्ट्रक्शन हयांनी आपल्या दि.14/02/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे निविदेमधील फुटपाथवरील प्रिकास्ट आर.सी.सी झाकणे तसेच मुख्य रस्त्यावरील प्रिकास्ट आर.सी.सी झाकणे पुरविणे व बसविणेकामी सर्व बाबींकरीता काम करणेस तयारी दर्शविली आहे.मे. नितेश मोहन मलवानी हयांनी आपल्या दि 14/02/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे निविदेमधील फुटपाथवरील प्रिकास्ट आर.सी.सी झाकणे तसेच मुख्य रस्त्यावरील प्रिकास्ट आर.सी.सी झाकणे पुरविणे व बसविणेकामी सर्व बाबींकरीता काम करणेस तयारी दर्शविली आहे. तरी मे. अनायडा एंटरप्रायजेस नी निविदेमधील फुटपाथवरील प्रिकास्ट आर.सी.सी झाकणे पुरविणेकामी अनु.क्र.1,2,3 मधील बाब क्र. a,b,c तसेच प्रिकास्ट आर.सी.सी. झाकणे बसविणेकामी अनु.क्र.a,b व c करीतामे.संजय कंन्स्ट्रक्शन, मे.श्री.गणेश एंटरप्रायजेस व मे.ओमकार एंटरप्रायजेस हयांनी निविदेमधील फुटपाथवरील प्रिकास्ट आर.सी.सी झाकणे पुरविणेकामी अनु.क्र. 1,2,3 मधील बाब क्र.a,b,c तसेच प्रिकास्ट आर.सी.सी. झाकणे बसविणेकामी अनु.क्र.a व b करीता तयारी दर्शविली असून त्यांची सदर बाबींकरीता पॅनलवर नियुक्ती करण्यात यावी, |

| | | |
|---|---|---|
| | | तसेच मे.साईदत्त कंन्स्ट्रक्शन व मे. नितेश मोहन मलवानी हयांनी निविदेमधील फुटपाथवरील प्रिकास्ट आर.सी.सी. झाकणे पुरविणे व बसविणेकामी तसेच मुख्य रस्त्यावरील प्रिकास्ट आर.सी.सी. झाकणे पुरविणे व बसविणेकामी सर्व बाबींकरीता काम करणेस तयारी दर्शविली असून त्यांची पॅनलवर सर्व बाबींकरीता नियुक्ती करण्यात यावी. तरी प्राप्त निम्नतत्म दरास मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क)/(ड) अन्वये संविदा करणेस मा. स्थायी समितीपुढे ठेवण्यास मंजुरीस्तव शिफारस असे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क)/(ड) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. <br> **अनुमोदक :- मा.श्री.किशोर ना.पाटील  सूचक :- मा.श्री. अतुल साळुंखे** <br> **ठराव सर्वानुमते मंजूर** |

**नगरसचिव**
**वसई-विरार शहर**
**महानगरपालिका**